Date of Advertisement
15th Feb 2022

सत्यमेव जयते

NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

# National Health Mission
## State Health Society Maharashtra (SHS), Mumbai
### SHS invites applications from eligible candidates for filling up the following posts
### (On contractual basis in Maharashtra State as indicated below.)

**Link for the filling online Google form for the DIstrict level posts- https://forms.gle/ZFr42vzkawxdQ7TPA**

| Sr.No | Name of the Post | Place of Posting | Age (Upper Limit) | Total No of Posts | Category | Essential Qualification | Essential Experience | Remuneration (In Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Specialist - Microbiologists | Thane, Ahemdnagar, Satara, Parbhani, Beed, Amrawati | 70 Years & Below | 6 | SC-1 ST-1 NT(C)-1 OBC-1 OPEN-2 **Total-6** | MD Microbiology | Preference will be given to experienced person | 75000 |
| 2 | Senior Consultant - Dakshata Mentors | Yavatmal | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | 1 | OPEN - 1 | Any medical graduate with MPH / MHA | 5 years relevant experience relaxable | 55000 (Additional 5000 for MBBS candidate) |
| 3 | Public Health Consultant - Divisional NLEP Consultant | Thane Circle, Nashik Circle, Kolhapur Circle, Aurangabad Circle, Latur Circle, Akola Circle, Nagpur Circle | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | 7 | SC-1 VJ(A)-1 OBC-1 EWS-1 OPEN-3 **Total-7** | Any medical graduate with MPH / MHA | 3 years relevant experience | 45000(Additional 5000 for MBBS candidate) |
| 4 | Senior Nursing Midwifery - Senior Nursing Midwifery Tutor | Wardha | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | 1 | OPEN - 1 | M.Sc. Nursing | 3 years relevant experience | 40000 |
| 5 | Executive Engineer- Electrical | Nagpur Circle(1) | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | 1 | Open-1 | BE Electrical | 5 years relevant Experience | 40000 |

Date of Advertisement
15th Feb 2022

# National Health Mission
## State Health Society Maharashtra (SHS), Mumbai
### SHS invites applications from eligible candidates for filling up the following posts
### (On contractual basis in Maharashtra State as indicated below.)

सत्यमेव जयते

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

**Link for the filling online Google form for the DIstrict level posts- https://forms.gle/ZFr42vzkawxdQ7TPA**

| Sr.No | Name of the Post | Place of Posting | Age (Upper Limit) | Total No of Posts | Category | Essential Qualification | Essential Experience | Remuneration (In Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | District Programme Manager | Nashik, Nandurbar, Pune, Satara, Sindhudurg, Parbhani, Beed, Amrawati, Wardha, Bhandara, Ratnagiri, Jalgaon, Akola, Buldhana | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | 14 | SC -2<br>ST - 1<br>NT(B)- 1<br>NT(D) -1<br>OBC - 3<br>EWS -1<br>OPEN - 5<br>**Total-14** | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health | Preference will be given to experienced person | 35000 ( No MBBS criteria) |
| 7 | Programme Manager - Public Health | Any District in Maharashtra | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | 121 | SC - 16<br>ST -9<br>VJ(A) - 4<br>NT(B) - 3<br>NT (C) - 4<br>NT(D) - 2<br>SBC - 2<br>OBC - 23<br>EWS - 12<br>OPEN - 46<br>**Total - 121** | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health | Preference will be given to experienced person | 35000 |

Date of Advertisement
15th Feb 2022

# National Health Mission
## State Health Society Maharashtra (SHS), Mumbai
## SHS invites applications from eligible candidates for filling up the following posts
## (On contractual basis in Maharashtra State as indicated below.)

सत्यमेव जयते

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

**Link for the filling online Google form for the DIstrict level posts- https://forms.gle/ZFr42vzkawxdQ7TPA**

| Sr.No | Name of the Post | Place of Posting | Age (Upper Limit) | Total No of Posts | Category | Essential Qualification | Essential Experience | Remuneration (In Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | District Account Manager | Chandrapur, Gadchiroli | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | 2 | OPEN-1<br>SC-1 | MBA (Finance) or M Com | 3 years relevant experience | 30000 |
| 9 | Monitoring & Evaluation Statistical Officer | Raigad, Nandurbar, Amrawati, Gadchiroli, Sindhudurg, Chandrapur | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | 6 | SC-1<br>ST-1<br>OBC-1<br>EWS-1<br>OPEN-2<br>**Total-6** | M.Sc. Statistics | Preference will be given to experienced person | 30000 |
| 10 | Deputy Engineer-Civil | Washim, Amravati, Bhandara | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | 3 | OPEN-1<br>OBC-1<br>SC-1<br>**Total-3** | BE Civil | Preference will be given to experienced person | 30000 |
| 11 | Coordinator | Wardha | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | 1 | OPEN-1 | Any Post Graduate Degree | 2 years relevant experience | 28000 |
| 12 | Engineer Biomedical - IPHS Coordinators | Palghar, Pune, Sindhudurg, Bhandara | 18 to 38 years for Open category, 18 to 43 years for reserved categories | 4 | SC - 1<br>NT(D) -1<br>OBC - 1<br>OPEN - 1<br>**Total-4** | Graduate in Biomedical Engineering | Preference will be given to experienced person | 25000 |

**Note: Link for the filling online Google form for the Distirct level posts- https://forms.gle/ZFr42vzkawxdQ7TPA**

**Commissioner, Health Services & Mission Director,**
**National Health Mission, Mumbai**
**Arogya Bhavan, 8th Floor, St.George's Hospital Compound,**
**P.D'.Mello Road, Mumbai – 400 001.**

**राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र राज्य कार्यक्रमांतर्गत रिक्त पदभरतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार मंजुर पदांपैकी रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात www.arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून अर्ज करावयाच्या पध्दतीबाबत सर्वसाधारण सुचना/माहिती पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत. खालील सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करून अर्ज विहित केलेल्या पध्दतीनुसारच सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे व जोडलेल्या प्रमाणपत्रांच्या/कागदपत्रांच्या प्रतींच्या आधारे उमेदवाराची पात्रता तपासण्यात येईल व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल. तथापि, अर्ज स्वीकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवार त्या पदाकरीता पात्र आहे असा होणार नाही. निवड प्रक्रियेदरम्यान कोणत्याही वेळी किंवा निवडीनंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याने किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी व/वा निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

**क) अर्ज करण्याच्या अनुषंगाने सुचना –**

१) सर्व उमेदवारांनी जाहिरातीत नमूद **गुगल लिंकवर** ऑनलाईन गुगल फॉर्ममध्येच अर्ज विहित कालावधीत भरणे आवश्यक आहे.
(जिल्हास्तरावरील पदांकरिता – https://forms.gle/ZFr42vzkawxdQ7TPA )
(राज्यस्तरावरील पदांकरिता– https://forms.gle/3yMqefzuxPJrWQTr8 )

२) अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्याची माहिती अचून भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

३) गुगल फॉर्म परीपुर्ण भरल्यावर त्याची प्रिंट काढावी.

४) वरील प्रिंट व अर्जात नमुद केलेल्या माहितीच्या पृष्ठ्यर्थ आवश्यक प्रमाणपत्रांच्या /कागदपत्रांच्या स्वसांक्षांकित प्रतीसह अर्ज मुद्दा (ट) मधील क्र.१० मध्ये नमूद पत्त्यावर विहित कालमर्यादेत सादर करावा. दिलेल्या कालावधीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.टपालाने/कुरीयरने पाठविलेले अर्ज या कार्यालयास उशीरा प्राप्त झाल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५) अर्जासोबत अनावश्यक कागदपत्र जोडु नयेत.

६) अर्जदाराने प्रत्यक्ष भरलेल्या गुगल फॉर्मची प्रत व त्यासह आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्र जोडलेली नसल्यास असा अर्ज अपूर्ण समजण्यात येऊन तो रद्द करण्यात येईल.

७) उमेदवाराने एका पदाकरीता एकच गुगल फॉर्म भरणे आवश्यक आहे.

८) उमेदवार एका पेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करू शकतो. तथापि प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र गुगल फॉर्म भरणे आवश्यक असून वरील निर्देशांप्रमाणे तो या कार्यालयास विहित मुदतीत सादर करणे बंधनकारक आहे. प्रत्येक पदाकरीता अर्ज शुल्काचा स्वतंत्र धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे.

**ख) वयोमर्यादा –**

१) गुगल अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच २६ फेब्रुवारी २०२२ रोजी उमेदवाराचे वय प्रत्येक पदाकरीता जाहिरातीत विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.

२) राखीव प्रवर्गातील उमेदवारांकीरता कमाल वयोमर्यादा पाच वर्षांनी शिथिलक्षम राहील.

३) राष्ट्रीय आरोग्य अभियानात सद्यस्थितीत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना कमाल वयोमर्यादा लागू राहणार नाही. तथापि अर्जासोबत सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कार्यालयाच्या प्रमुखांचे तशा आशयाचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

**ग) अर्ज भरण्याबाबतच्या सुचना –**

१) सर्वप्रथम ज्या पदाकरीता अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नाव ड्रॉप बॉक्स (DROP BOX) मधून निवडावे.

२) उमेदवाराने स्वतःचे पूर्ण नाव (माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) प्रमाणपत्राप्रमाणेच अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी) प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

३) अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

४) माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.) प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीखच अर्जात नमूद करावी.

५) गुगल फॉर्म सादर करण्याच्या अंतिम तारखेस (२६ फेब्रुवारी २०२२ ) असणारे वय (वर्ष, महिने व दिवस) अर्जात अचून नमुद करावे.

६) अर्जात लिंग,वैवाहिक स्थिती याबाबतची माहिती अचूक नमूद करावी.

७) अर्जामध्ये उमेदवाराने स्वतःचा वैध ईमेल आयडी/पर्यायी ईमेल आयडी, चालू भ्रमणध्वनी क्रमांक/ पर्यायी भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे.आवश्यकतेनुसार पात्र/अपात्र यादीमधील मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखती संदर्भात देण्यात येणा-या सुचना ईमेलव्दारे देण्यात येतील तसेच पात्र उमेदवारांपैकी गुणानुक्रमे मुलाखतीसाठी पात्र

उमेदवारांची यादी संकेतस्थळावर देखील प्रसिद्ध करण्यात येईल.त्यामुळे ईमेल आयडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू राहतील व ईमेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. **तसेच पदभरती बाबत पात्र/अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी आणि पदभरती बाबतच्या आवश्यक सुचना व सुधारणा वेळोवेळी या कार्यालयाच्या** (www.arogya.maharashtra.gov.in) **संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतील याकरिता वेळोवेळी संकेतस्थळावर भेट देणे देखील बंधनकारक आहे.**

८) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे. असल्यास त्याबाबतचे विहित प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

९) उमेदवाराने आपला धर्म व जातीचा तपशील अचूकपणे नमूद करावा. उमेदवार राखीव प्रवर्गात मोडत असल्यास त्याबाबतचे विहित प्रमाणपत्र सादर करावे. राखील प्रवर्गाच्या उमेदवाराने जात प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा उमेदवारास अराखीव प्रवर्गातील उमेदवार समजण्यात येईल व त्याला आरक्षपणाचा व त्याअनुषंगाने उपलब्ध इतर लाभांचा फायदा घेता येणार नाही.

१०) इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गात मोडणा-या उमेदवारांनी चालू वर्षाचे आवश्यक नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा अशा उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात येतील.

११) अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायमस्वरूपी पत्ता गुगल फॉर्ममध्ये अचूक नमूद करावा.

**घ) शैक्षणिक अर्हता/पात्रता –**

१) शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.

२) गुगल अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेस उमेदवाराकडे पदाकरीता आवश्यक किमान शैक्षणिक पात्रता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

३) आवश्यक शैक्षणिक अर्हता ज्या तारखेस प्राप्त केली आहे ती तारीख अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. (निकाल घोषीत केल्याचा दिनांक)

४) अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेल्या गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुणांची टक्केवारी नमूद करणे आवश्यक आहे. अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये रूपांतर करून ते प्रमाणित करून घ्यावे. व त्याची स्वसाक्षांकित प्रत सादर करावी.

५) अर्जात एकूण प्राप्त गुण नमुद न करता गुणांची अचुक टक्केवारी नमुद करावी. शैक्षणिक प्रमाणपत्रात नमूद गुणांची टक्केवारी व अर्जात नमुद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.

६) अर्जात नमूद केलेल्या सर्व शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्र/कागदपत्र अर्जासोबत जोडून सादर करणे अनिवार्य राहील. अर्जाच्या छाननी दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिका न जोडल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

७) पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यताप्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन निर्णय दि.१२ डिसेंबर २००६ मध्ये नमूद केलेल्या विद्यापीठांमधून प्राप्त केलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता ग्राह्य धरण्यात येईल.

८) गुगल अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेस उमेदवाराकडे पदाकरीता आवश्यक किमान शैक्षणिक पात्रता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

**ड) अनुभव –**

१) अर्ज करीत असलेल्या पदाकरीता विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अतिरिक्त आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचाच अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्याची दखल घेतली जाणार नाही.

२) अनुभवाचा तपशील नमूद करताना पहिली नियुक्ती कालावधी ते सध्याची नियुक्ती कालावधी या क्रमानेच द्यावा.

३) अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना ज्या कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे अशाच कार्यालयाचा तपशील फॉर्म मध्ये नमूद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.

४) अनुभवाचा तपशील नमूद करताना रूजू दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. दोनही तारखा अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास अशा अनुभवाचा विचार करण्यात येणार नाही.

५) ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**च) संगणक अर्हता व इतर –**

१) MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा त्याबाबतचा तपशील नमूद करावा.

२) टंकलेखन/शॉर्टहँड कौशल्याचा तपशील नमूद करताना फक्त कमाल गती (Maximum Speed) चा तपशील नमूद करावा. (उदा. एखाद्या उमेदवाराचे ३० श.प्र.मि. व ४० श.प्र.मि. असे टंकलेखन पूर्ण झाले असल्यास सदर उमेदवाराने फक्त ४० श.प्र.मि. गतीच्या टंकलेखनाचा तपशील नमूद करावा.)

**छ) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र –**

१) शासनाच्या धोरणानुसार उमेदवारास लहान कुटुंब धोरणाचे पालन करणे आवश्यक राहील.

२) उमेदवाराने अर्ज सादर करीत असताना या अनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

३) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र नमुना सोबत जोडला आहे.

**ज) अर्ज शुल्क –**

१) उमेदवारास अर्जासोबत अर्ज शुल्काचा धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.२००/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१००/- रकमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) अर्ज शुल्क असेल. धनाकर्ष पुढील नावे काढावा.

"STATE HEALTH SOCIETY MAHARASHTRA SNA"

२) योग्य धनाकर्षाशिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

३) एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करीत असल्यास प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र धनाकर्ष जोडावा.

**झ) उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी-**

१) उमेदवाराने गुगल फॉर्मची प्रिंट काढल्यावर फोटो करीता राखील जागेवर त्याचे अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये.

२) स्वाक्षरीकरीता राखील जागेत स्वाक्षरी करावी.

**त्र) निवड प्रक्रिया –**

१) सदर पदभरतीच्या अनुषंगाने निवड प्रक्रिया केवळ मुलाखतीद्वारे अथवा लेखी व मुलाखतीव्दारे एकत्रितपणे ठरविण्याचे सर्व अधिकार आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई यांनी राखुन ठेवले आहेत.

२) प्राप्त होणा-या अर्जांच्या संख्येनुसार उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

३) लेखी परीक्षा घ्यावयाची झाल्यास त्याबाबत संबंधित सुचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

४) मुलाखतीव्दारे निवड करावयाची असल्यास प्राप्त अर्जांना मा. आयुक्त यांच्या मान्यतेने निकष लावून १:३ ते १:५ उमेदवारांची निवड मुलाखतीसाठी करण्यात येईल. मुलाखतीने उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन पदवी परीक्षेतील अंतिम वर्षाचे गुण, अतिरिक्त अर्हता , अनुभव आणि मुलाखतीचे गुण विचारात घेऊन खालील तक्त्यानुसार करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ | पदाकरीता आवश्यक किमान अर्हता | अंतिम वर्षातील एकूण प्राप्त गुणांच्या (टक्केवारीच्या) प्रमाणात ५० गुण |
| आ | पदाकरीता आवश्यक अतिरिक्त अर्हता | अंतिम वर्षातील एकूण प्राप्त गुणांच्या (टक्केवारीच्या) |

| | | |
|---|---|---|
| | /पदव्युत्तर अर्हता | प्रमाणात १० गुण |
| इ | पदाकरीता आवश्यक अनुभव | प्रत्येक वर्षाकरीता ५ गुण (कमाल २० गुण) |
| ई | आवश्यकतेनुसार मुलाखत | २० गुण |

५) कोविड-१९ साथीच्या परिस्थितीमुळे मुलाखती/लेखी परिक्षा घेणे शक्य नसल्यास पदवी परीक्षेचे गुण/अनुभव विचारात घेऊन निवड प्रक्रिया राबविण्यात येईल.

६) उपरोक्त निवड प्रक्रियेसंदर्भात मुद्दा क्र.१ नुसार आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडे राहतील,त्यामुळे उपरोक्त नमूद निवड प्रक्रियेत परिस्थिती अनुरूप बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**ट) सर्वसाधारण सुचना-**

१. उपलब्ध करुन देण्यात येणा-या गुगल लिंकव्दारे प्राप्त होणाराच अर्ज उमेदवारांनी भरणे आवश्यक आहे.

२. सदर पदभरती प्रक्रियेबाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती आरोग्य विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी www.arogya.maharashtra.gov.in या संकेस्थळास भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

३. जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत बदल होण्याचा संभव आहे.

४. सदर पदे आरोग्य सेवेच्या दृष्टीने महत्वाची असल्याने लवकरात लवकर भरणे आवश्यक आहे. तथापी राज्य शासनाने एसईबीसी आरक्षण रद्द झाल्याच्या अनुषंगाने अद्याप छोटया गटांच्या पदांकरीता आरक्षण जाहीर केलेले नसल्याने सदर पदांकरीता दर्शविण्यात आलेले आरक्षण हे तात्पुरते आहे. आरक्षण धोरण जाहीर होताच त्यानुसार नियुक्ती करण्यात येणा-या कंत्राटी कर्मचा-यांचा समावेश त्यांच्या प्रवर्गानुसार त्या-त्या बिंदूवर केला जाईल व अतिरिक्त ठरणा-या कंत्राटी कर्मचा-यांच्याबाबतीत योग्य निर्णय त्या-त्या वेळी घेण्यात येईल.

५. जाहीरातीत नमूद केलेली पदे ही पुर्णतः कंत्राटी स्वरुपाची असून ती राज्यशासनाची नियमित पदे नाहीत या पदांचा राज्य शासनाच्या पदांशी काहीही संबंध नसून उमेदवार राज्य शासनांच्या नियमित पदावर समायोजन करण्यांची मागणी करु शकणार नाही.

६. जाहीरातीत नमूद केलेले पदाचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

७. जिल्हास्तरावरील पदांकरीता अर्ज केलेल्या व नियुक्तीस पात्र ठरलेल्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार राज्यातील कोणत्याही जिल्हयातील पदस्थापनेच्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल .

८. राज्यस्तरावरील पदांकरीता अर्ज केलेल्या व नियुक्तीस पात्र ठरलेल्या उमेदवार मुंबई व पुणे येथे पदस्थापनेकरीता पात्र राहतील.

९. गुगल फॉर्म भरण्यांची अंतिम तारीख **२६ फेब्रुवारी २०२२** रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत असेल.

१०.गुगल फॉर्म पुर्ण भरल्यावर त्यांची प्रिंट काढावी सदर प्रिंटसोबत आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती व धनाकर्ष जोडून अर्ज पुढील पत्त्यावर **दि.०७ मार्च २०२२** पुर्वी पोहोचेल अशा रीतीने हस्तदेय सादर करावा किंवा टपालाने/कुरीयरने कार्यालयीन वेळेत सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत मिळेल अशा रीतीने पाठवावा.

**मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,**

**राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, ३ रा मजला,**

**सेंट जॉर्जेस रुग्णालय परिसर, पी. डिमेलो मार्ग,**

**सी. एस. एम. टी. जवळ, फोर्ट, मुंबई – ४०० ००१.**

११) अर्जासोबत आवश्यक रकमेचा धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे.

१२) अर्ज व त्यासोबत जोडलेली सहपत्र चांगल्या लिफाफ्यात बंद करुनच सादर करावी लिफाफ्यावर अर्ज केलेल्या पदाचे नाव व अर्जदाराचे नाव नमूद करावे.

१३) हस्तदेय अर्ज वरील नमुद पत्त्यावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी ( शनिवार,रविवार व सावर्जनिक सट्टीचे दिवस वगळून) सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.१५ या वेळेतच स्वीकारले जातील.

१४) सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे व/वा सदर पदभरती अंशतः किंवा पुर्ण रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांनी राखून ठेवले आहेत.

१५) सदर जाहीरातीच्या अनुषंगाने काही शंका असल्यास ०२२ २२७१७६०९/५०० या क्रमाकावर संपर्क करावा.

# प्रतिज्ञापन

## नमुना अ

मी श्री./श्रीमती/कुमारी ..................................................................

श्री........................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय....... वर्ष, राहणार,..................................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी .............................................. या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ..............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

सही/-

दिनांक:-